# महाराष्ट्र कृषि विद्यापीठे परीक्षा मंडळ

महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद इमारत, १३२.बी. भोसलेनगर, पुणे - ४११ ००७.

दुरध्वनी क्रमांक / फॅक्स : 020-25510419/519 ई-मेल : mauebpune@yahoo.co.in

जा.क्र.मकृविपमं/साप्रप-२०२१ /बातमी/ 89 / २०२१ दि.१०.०५.२०२१

प्रति,

मा. कुलसचिव/ उप. कुलसचिव (विद्या),
१) महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी
२) डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला
३) वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी
४) डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली

विषय :- बातमी प्रसिध्द करणेबाबत...

महोदय,

महाराष्ट्रातील चारही कृषी विद्यापीठांतर्गत पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या सन २०२१-२०२२ या शैक्षणिक वर्षाच्या प्रवेशासाठी घेण्यात येणा-या सामाईक प्रवेश परीक्षा (Online Application) संबंधीची सोबत जोडलेली बातमी आपल्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावी. तसेच, आपल्या विद्यापीठांतर्गत सर्व महाविद्यालयांच्या प्राचार्यांच्या माहितीसाठी अग्रेषित करावे.

कळावे,

सोबत - बातमीची प्रत.

आपला विश्वासू,

नियंत्रक

प्रत : १) मा. अध्यक्ष, संचालक शिक्षण समन्वय समिती तथा अधिष्ठाता (कृषि), म.फु.कृ.वि, राहुरी यांना माहितीस्तव.

२) मा संचालक शिक्षण तथा अधिष्ठाता (कृषि),
१) महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी
२) डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला
३) वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी
४) डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली यांना माहितीसाठी सविनय सादर.

३) मा संचालक शिक्षण, महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद, पुणे यांना माहितीस्तव.

Examination Division
Dr. P.D.K.V., Akola
Inward No. 336
20 MAY 202
A.R.(Exam.) Dy.Registrar (Acd

S.O Exam

Shri More.

Scanned by CamScanner

## बातमी प्रसिध्दीसाठी

महाराष्ट्रातील चारही कृषि विद्यापीठांमध्ये उपलब्ध असणा-या विविध विद्या शाखांमध्ये शैक्षणिक वर्ष २०२१-२०२२ साठी पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी सामाईक प्रवेश परीक्षा - २०२१ महाराष्ट्र कृषि विद्यापीठे परीक्षा मंडळ, पुणे यांचे मार्फत आयोजित करण्यात आली आहे. सदर परीक्षेसाठी संबंधीत विद्याशाखेचे पदवीधर आणि सन २०२०-२०२१ या शैक्षणिक वर्षाच्या अंतिम पदवी परीक्षेस बसणारे विद्यार्थी पात्र राहतील. ऑनलाईन (Online) अर्ज भरण्याची तारीख २०.०५.२०२१ ते १५.०६.२०२१ अशी राहील. ऑनलाईन अर्ज भरल्यानंतर डेबिट /क्रेडीट कार्डव्दारे किंवा जनरेट होणा-या चलनाव्दारे स्टेट बँक ऑफ इंडियाच्या स्थानिक शाखेत परीक्षा शुल्क दि.२०.०५.२०२१ ते दि.२०.०६.२०२१ तारखेपर्यंत स्वीकारली जाईल. ही परीक्षा दिनांक ०८ ऑगस्ट, २०२१ ते ११ ऑगस्ट, २०२१ या कालावधीत महाराष्ट्रातील वीस केंद्रांवर आयोजित करण्यात येत आहे. सदर परीक्षेसाठी विहित नमुन्यातील अर्ज महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद, पुणे यांचे http://www.mcaer.org या संकेतस्थळावर स्वतः भरावयाचे आहे. अर्ज भरण्यापूर्वी संपूर्ण माहितीपत्रक वाचणे गरजेचे आहे. संबंधित अर्ज महाराष्ट्र कृषि विद्यापीठे परीक्षा मंडळ, पुणे यांच्याकडे पाठविण्याची आवश्यकता नाही. अंतिम पात्र व अपात्र उमेदवारांची यादी दिनांक ०२.०७.२०२१ रोजी संकेतस्थळावर उपलब्ध होईल. पात्र उमेदवारांनी आपले परीक्षा प्रवेश पत्र वरील संकेतस्थळावरुन दि.२०.०७.२०२१ पासून स्वतः प्रिंट काढून उपलब्ध करुन घ्यावयाचे आहेत.

उत्तराची नमुना पत्रिका दि.२५.०८.२०२१ व परीक्षेचा निकाल दि.३०.०८.२०२१ रोजी महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद, पुणे यांचे http://www.mcaer.org या संकेतस्थळावर पाहण्यास उपलब्ध राहील. या संदर्भात अधिक माहितीसाठी ०२०-२५५२८११९ / ०२०-२५५२८५१९ या दुरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा असे डॉ. एस.एल.बडगुजर, नियंत्रक, महाराष्ट्र कृषि विद्यापीठे परीक्षा मंडळ, पुणे यांनी कळविले आहे.

दिनांक : १९.०५.२०२१

स्थळ : पुणे

नियंत्रक

महाराष्ट्र कृषि विद्यापीठे परीक्षा मंडळ, पुणे